**सीआयडीएचसी ०२०९०९**
**आरबीआय/२००९-१०/१४२**
**डीबीओडी क्र.एलईजी. बीसी. ३७/०९.०७.००५/२००९-१०** **सप्टेंबर २,२००९**

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका
(आरआरबी सोडून)

महोदय,

**आत्मकेंद्रीपणा (ऑटिझम), मेंदूचा लकवा, बुध्दीमांद्य आणि बहुपंगुत्व असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी असलेल्या राष्ट्रीय ट्रस्ट अधिनियम,१९९९ खाली स्थापन केलेल्या स्थानिक स्तरीय समितीबाबतची माहिती प्रदर्शित करणे.**

कृपया आमचे ग्राहकसेवेवरील महापरिपत्रक डीबीओडी.क्र.एलईजी.बीसी/९/०९०.७.००६/२००९-१० च्या परिच्छेद ११चा संदर्भ घ्यावा.त्यात बँकाना सांगण्यात आले होते की,ह्या अधिनियमाखाली येणारे अपंगत्व असलेल्या व्यक्तींसाठी त्यांच्या कायदेशीर पालकांनी बँकखाती उघडण्यासाठी, त्यांनी मेंटल हेल्थ अधिनियम, १९८७ खाली जिल्हा न्यायालयाने दिलेल्या पालकत्व प्रमाणावर किंवा नॅशनल ट्रस्ट फॉर दि वेलफेअर ऑफ पर्सन्स विथ ऑटिझम, सेरेब्रल पॅल्सी, मेंटल रिटार्डेशन, अँड मल्टिपल डिसएबिलिटीज् अधिनियम,१९९९ (ह्यापुढे ह्याला मल्टिपल डिसएबिलिटीज् ॲक्ट असे संबोधले आहे.)खाली स्थापन झालेल्या स्थानिक स्तरीय समितीच्या प्रमाणावर अवलंबून रहावे. बँकांना असेही सांगण्यात आले होते की त्यांच्या शाखा योग्य ते मार्गदर्शन करीत असल्याची त्यांनी खात्री करुन घ्यावी ज्यामुळे अशा अपंग व्यक्तींच्या आईवडिलांना/पालकांना ह्याबाबतीत कोणत्याही अडचणी/त्रास होणार नाही.
२) दिल्ली उच्च न्यायालयाच्या पुढील एका प्रकरणामध्ये माननीय न्यायालयाने निदेश दिले आहेत की, सर्व बँकांनी खात्री करून घ्यावी की त्यांच्या शाखांनी ठळक जागी पुढील गोष्टी प्रदर्शित केल्या आहेत. १) ह्या अधिनियमाच्या (मेंटल डिसएबिलिटीज् ॲक्ट)खाली मिळणाऱ्या सुविधांची माहिती २) असे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी संबधित पक्ष स्थानिक स्तरीय समितीकडे जाऊ शकतात हे सत्य आणि (मेंटल डिसएबिलिटीज् ॲक्टखाली दिलेले प्रमाणपत्र हे स्विकारले जाते. आणि ३) त्या क्षेत्रातील स्थानिक स्तरीय समितींची माहिती न्यायालयाने ह्याशिवाय असेही निदेश दिले आहेत की ही माहिती स्थानिक भाषा व इंग्रजी/हिंदी (किंवा दोन्हीही भाषात प्रदर्शित केली जावी.)

३) न्यायालयाच्या वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात बँकांना सांगण्यात येत आहे. त्याचप्रमाणे (मेंटल डिसएबिलिटीज् ॲक्टच्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यास बँकांना सांगण्यात येत आहे. येथे नोंद घेण्यात यावी की, स्थानिक स्तरीय समितीबाबतची सविस्तर माहिती, दि नॅशनल ट्रस्ट फॉर दि वेलफेअर ऑफ पर्सन्स विथ ऑटिझम, सेरेब्रल पॅल्सी, मेंटल, अँड मल्टिपल डिसएबिलिटीज्च्या वेबसाईटवर, म्हणजे, www.thenationaltrust.in वर उपलब्ध आहे.

आपला
(बी महापात्रा)
मुख्य महाव्यवस्थापक